जीवनात काही साध्य करायचे असेल, तर परिश्रमांना आपलेसे करा.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com


संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २७ एप्रिल २०२५ | अंक १३५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# दहशतवाद्यांना टिपण्यासाठी आता ध्रुव उतरणार थेट काश्मिरात; संरक्षण खात्याची परवानगी




नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर जागे झालेल्या संरक्षण मंत्रालयाने लष्कराला ध्रुव हेलिकॉप्टर वापरण्याची परवानगी दिली आहे. काश्मिरातील दहशतवादी कारवायांवर नजर ठेवण्यासाठी या हेलिकॉप्टरचा उपयोग होणार आहे. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांना जीव गमवावा लागला होता. या भागात जवानांची तैनाती असती तर लोकांचा बळी गेला नसता ही वस्तुस्थिती आहे. संरक्षण मंत्रालयाने काश्मीरमधील छुप्या दहशतवादी कारवायांवर बारीक नजर ठेवण्यासाठी लष्कराला ॲडव्हांस लाइट हेलिकॉप्टर ध्रुवचा वापर करण्याची परवानगी दिली आहे. त्याचा मोठा फायदा होणार आहे. डोंगराळ प्रदेशात ऑपरेशन करण्यात आहे सक्षम ध्रुव हेलिकॉप्टर डोंगराळ प्रदेशात ऑपरेशन करण्यात सक्षम आहे. सशस्त्र सेना आणि तटरक्षक दलाकडून या हेलिकॉप्टरचा उपयोग केला जातो. लष्कराकडे १८० ध्रुव हेलिकॉप्टरसह अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज ६० रुद्र हेलिकॉप्टर आहेत. गुजरातच्या पोरबंदर विमानतळावर कोस्ट गार्ड एएलएच एमके ३ च्या भीषण अपघातानंतर सर्व ध्रुव हेलिकॉप्टर बेड्यात ठेवण्यात आले होते. जम्मू - भारत-पाक आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्तानने अधिक सैन्याची जमवाजमव करण्यास सुरुवात केली आहे. तेथील अनेक चौक्यांवर असलेल्या पाकिस्तानच्या असलेल्या सैनिकांपेक्षा तिप्पट-चौपट संख्येने त्या देशाचे सैनिक दिसू लागले आहेत. पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत व पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणावर तणाव निर्माण झाला आहे. भारत कारवाई करणार या भीतीने पाकिस्तानी लष्करानेही सीमेवरील हालचाली वाढविल्या आहेत. जम्मूच्या सीमेवर पाकने १३ चिनाब रेंजर्स, तर सांबा, कठुआच्या सीमेवर अनुक्रमे १४ व २६ चिनाब रेंजर्सचे अतिरिक्त सैनिक पाकिस्तानने तैनात केले आहेत. पाकिस्तानी लष्कराने आंतरराष्ट्रीय सीमा व नियंत्रण रेषेवर रणगाडे, स्वयंचलित तोफखाना व अन्य शस्त्रास्त्रे मोठ्या प्रमाणावर आणण्यास प्रारंभ केला आहे. आम्ही कोणत्याही संघर्षासाठी सज्ज आहोत असा आव पाकिस्तानने आणला असला तरी भारताने याआधी केलेला सर्जिकल स्ट्राइक व एअर स्ट्राइक यांच्यामुळे पाक लष्कर धास्तावले आहे, अशी माहिती भारतीय लष्कराच्या सूत्रांनी दिली.


# बुडणाऱ्या मुलाला वाचवताना आई, आत्यासह तिघांचा मृत्यू

## एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्यानंतर खडपोली रामवाडी गावात शोककळा पसरली

रत्नागिरी जिल्ह्यातील खडपोली रामवाडी येथे दुर्दैवी घटना घडली. वाशिष्ठी नदीच्या डोहात मुलाला वाचवताना आई, आत्यासह तिघांचा बुडून मृत्यू झाला. आठ वर्षीय लक्ष्मण कदम नदीच्या डोहात आंघोळ करत होता. त्यावेळी तो बुडू लागला. त्याला वाचवण्यासाठी त्याची आई लता कदम आणि आत्या रेणुका शिंदे यांनी पाण्यात उडी घेतली. परंतु या घटनेत तिघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. वाशिष्ठी नदीचा डोह १२ ते १४ फूट खोल आहे. या ठिकाणी नदीचे पाणी वाहत असते.

चिपळूण येथील खडपोली रामवाडी येथील वाशिष्ठी नदीत लता कदम आणि रेणुका शिंदे कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. त्यांच्यासोबत लता कदम यांचा आठ वर्षांचा मुलगाही होता. दोन्ही महिला कपडे धुत असताना लक्ष्मण आंघोळ करण्यासाठी पाण्यात उतरला. त्यावेळी तो बुडू लागला. लता कदम यांचे त्याच्याकडे लक्ष गेले. त्यावेळी त्यांनी त्याला वाचवण्यासाठी पाण्यात उडी घेतली. परंतु हे दोघे बुडू लागले. हा प्रकार रेणुका शिंदे यांच्या लक्षात येताच त्यांनीही पाण्यात उडी घेतली. परंतु त्या डोहात तिघांचा बुडून मृत्यू झाला.

नदीवर कपडे धुण्यासाठी गेलेले तिघे



घरी परत आले नाही. त्यामुळे त्यांचा शोध सुरु झाला. त्यावेळी नदीत दुर्घटना घडल्याचे कुटुंबीयांना लक्षात आले. त्यानंतर गावकऱ्यांनी त्या तिघांच्या मृतदेहाचे शोधकार्य सुरु केले. नदीच्या डोहातून त्यांचे मृतदेह बाहेर काढले.

घटनेची माहिती मिळताच शिरगाव पोलीस घटनास्थळी पोहचले. मात्र, त्यापूर्वीच तिघांचे मृतदेह डोहातून बाहेर काढण्यात यश आले होते. या प्रकरणाची नोंद शिरगाव पोलिसांत करण्यात आली आहे. पोलिसांनी तिन्ही मृतदेहांचा पंचनामा केला. एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्यानंतर खडपोली रामवाडी गावात शोककळा पसरली. मृतांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले

# प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा.आरबाज आतार

## ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून किंवा सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी 30 एप्रिल पर्यंत करून घ्यावी



येळंब घाट प्रतिनिधी प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सर्व्हे सुरू असून बीड तालुक्यातील नागरिकांनी सध्या सुरू असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा व यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी नोंदणी करण्यासाठी 30 एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर सर्व गोरगरीब लोकांनी प्रधानमंत्री आवास योजने मध्ये आपले सर्व्हे करून घ्यावे असे आव्हान पत्रकार आरबाज आतार यांनी केले आहे

# मुंबई-नाशिक महामार्गावर बसचा भीषण अपघात, ८ वर्षांच्या चिमुकलीने गमावला जीव, अनेक जखमी

मुंबई नाशिक महामार्गावर भिवंडजीवळ बसचा एक भीषण अपघात झाला असून त्यामध्ये 8 वर्षांच्या मुलीने जीव गमावला आहे. तर या अपघातात 10-12 जण जखमी झाले असून त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भिवंडीजवळील पडघा गावाजवळ हा अपघात घडला आहे. पिकनिकसाठी गेलेल्या कुटुंबावर काळाने हा घाला घातला असून 8 वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला. जखमींपैकी 3 जणांची प्रकृती गंभीर असल्याचं समजतं. अपघाताचे वृत्त समजाताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळू धाव घेत मदकार्य सुरू केलं. याप्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.मिळालेल्या



माहितीनुसार, महामार्गावरील पडघा वडपे गावाजवळ अपघात घडला. बसचालक अतीवेगात असल्याने त्याचे बसवरील नियंत्रण सुटलं आणि बस थेट उड्डाणपुलाखालील बोगद्याला धडकली. आणि मोठा अपघात झाला. अपघातावेळी बसमध्ये 20 प्रवास होते. भिवंडीतील काही कुटुंबीय खडवली येथे पिकनिकसाठी गेले होते. मात्र परत येताना रात्री त्यांच्या बसला अपघात झाला. यामध्ये एकाच कुटुंबातील 10 ते 12 जण जखमी झाले. तर 8 वर्षांची मुलगी मृत्यूमुखी पडली.

या अपघातामध्ये जखमी झालेल्या नागरिकांना उपचारासाठी तातडीने भिवंडी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यापैकी तिघांची प्रकृती अतिशय गंभीर असल्याची माहितीदेखील समोर आली आहे. भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख हे देखील रुग्णालयात दाखल होऊन त्यांनी जखमींची विचारपूस केल्याचे समजते. याप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

# नवसाला पावणारा हनुमान यात्रा उत्सव..बीडच्या मारुतीची पांगरी गावात लाखो भाविकांची गर्दी...

बीड प्रतिनिधी :- अनवाणी कावड आणण्याची शेकडो वर्षाची परंपरा..सर्व जाती-धर्माचे लोक एकत्रित येऊन साजरा करतात उत्सव गुलालाची उधळण आणि हनुमंताची अनोखी आख्यायिका..

शिरूर कासार तालुक्यातील मारुतीची पांगरी या गावातील नवसाला पावनारा मारूती ची मोठ्या उत्साहात यात्रा संपन्न. दिनाक21व 22/4/2025 या दोन दिवशी यात्रा भरली कालाषटमी ला गंगाजल मारूती रायाला कावडी ने पाणी आणून वाहीले दोनशेहून अधिक कावडी होत्या ,महापंगती चा प्रसादा चा लाभ लाखो लोकांनी एकत्र येऊन घेतला .दिनांक 13/4/2025 ला 62 वा सप्ताह आयोजित केला व याची सागता दिनांक 22/4/2025 ला झाली.



पांगरी गाव वघोलेवाडी जाधववाडी गायकवाडी आनंदवाडी सह परिसरातील लाखो भाविक भक्त यात्रेला आले व उत्सव आनंद साजरा केला...

# खरंच इथं सापडायचे नाग? मग नागपूर नावा मागील इतिहास काय? जाणून घ्या खरी कहाणी

महाराष्ट्रातील अनेक शहरं ही देशाच्या नकाशावर ठळकपणे दिसतात. ती लोकप्रिय आहेत. नागपूर पण असेच एक लोकप्रिय शहर आहे. नागपूर ही राज्याची उपराजधानी आहे. हिवाळी अधिवेशन येथे भरते. हे देशातील मध्यवर्ती शहर म्हणून पण ओळखले जाते. हे शहर ऑरेंज सिटी म्हणून पण ओळखल्या जाते.- पण या शहराला नागपूर हे नाव कशामुळे पडले? खरंच सापांमुळे हे नाव पडलं का? काय आहे त्याचा इतिहास? जाणून घ्या... 18 व्या शतकात स्थापना या शहराची स्थापना 18 व्या शतकात करण्यात आली होती. नागपूर हे एकदम हटके नाव आहे. या नावावरून अनेकांना वाटते अथवा काही जण गंमतीने इथं फार नाग, साप सापडायचे म्हणून या शहराचे नाव नागपूर असे पडले असे सांगतात. पण या नावामागे एक इतिहास आहे. तो अनेकांना माहिती नाही. तुम्हाला माहिती आहे का, या शहराला नागपूर हे नाव का पडले ते? नागपूरची संत्री संपूर्ण जगात लोकप्रिय आहेत. येथील रसरशीत आणि गोड संत्र्यांना परदेशात सुद्धा मोठी मागणी आहे. अनेक टन संत्री देशातच नाही तर परदेशात सुद्धा पाठवण्यात येतात. या शहराचा इतिहास जवळपास 3 हजार वर्षे जुना आहे. मग संत्र्यांसाठी लोकप्रिय असलेल्या या शहराला नागपूर हे नाव, ही ओळख कशी मिळाली? यामुळे पडले नागपूर नाव या शहराचे नाव नागपूर असल्याबाबत अनेक मत प्रवाह आहेत. येथे नागवंशीय लोकांची वस्ती असल्याने या गावाला नागपूर हे नाव पडले असे एक मत आहे. तर काही जण दुसरे मत मांडतात. नाग नदीच्या नावावरून या शहराला नागपूर असे नाव पडल्याचा दावा करण्यात येतो. नाग नदी नागपूरमधून वाहते. नागपूरचे जुने नाव माहिती आहे का? नागपूर हे नाव मिळणाऱ्या पूर्वी या गावाला दुसऱ्याच नावाने




ओळखले जायचे. नागपूरचे जुने नाव फनिपूर अथवा फणिंद्रपुरा असे होते. हे एक मराठी नाव आहे, त्याचा अर्थ फणादारी नाग अथवा साप. काही दाव्यानुसार, नागपूर शहर जिथे आहे, तिथे पूर्वी नागफणीचे जंगल होते. त्यावेळी तिथे नाग सुद्धा मोठ्या संख्येने होते. पण काही लोक हा संदर्भ नागवंशीय लोकांसाठी असल्याचा दावा करतात. आज नागपूर हे शिक्षण, व्यापार, राजकारणापासून इतर प्रांतात प्रगतीवर आहे.

संपादकीय

# दहशतवाद्यांच्या अमानुष क्रौर्याचे प्रतीक

सहकुटुंब सुट्टीचा आनंद लुटणाऱ्या पर्यटकांवरील हल्ला, हे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांच्या अमानुष क्रौर्याचे प्रतीक आहे. या बेछूट गोळीबारात किमान २७ नागरिकांचा बळी गेला. दहशतवाद्यांनी पर्यटकांना टिपून, धर्म विचारून राक्षसी पद्धतीने गोळ्या घालण्याच्या कृत्याने सारा देश शोकसंतप्त झाला आहे. अंतर्गत प्रश्नांनी मोडकळीला आलेल्या पाकिस्तानचे शेपूट अजूनही वळवळत असल्याचे या हल्ल्यातून दिसते. गेल्या काही वर्षांत तुलनेने शांत असलेल्या आणि पर्यटकांनी गजबजलेल्या काश्मीरमध्ये हल्ला घडवून तिथे दहशत आणि अशांतता निर्माण करणे हाच ङ्गना-पाकफइरादा यामागे दिसतो. काश्मीरला आपली दुखरी नस संबोधून आणि द्विराष्ट्र सिद्धान्ताचा उल्लेख करून पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी भारताविरोधात गरळ ओकल्यानंतर आठवड्यातच हल्ला होणे हा निश्चितच योगायोग नाही. त्यामुळेच हे राक्षसी कृत्य करणाऱ्या दहशतवाद्यांबरोबरच पाकिस्तानातील त्यांच्या बोलवित्या धन्यांनाही कायमचा धडा शिकवलाच पाहिजे. पाकिस्तानातील दहशतवादी संघटना ङ्गलष्कर ए तैयबाफच्या पिलावळीतील ङ्गद रेझिस्टन्स फ्रंटफने (टीआरएफ) या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. गेल्या काही काळात याच संघटनेच्या सदस्यांनी भरती करून नागरिकांच्या वेचून हत्या केल्या होत्या. मात्र, या घटनेपासून नामानिराळा राहण्याच्या पाकिस्तानच्या दाव्यावर लहान मूलही विश्वास ठेवणार नाही. या भीषण हल्ल्यामागे अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संदर्भ आहेत. जम्मू-काश्मीरचे वेगळेपण जपणारे घटनेतील ३७०वे कलम इतिहासजमा झाले, तेथील निवडणुकीत भरघोस मतदान होऊन लोकनियुक्त सरकारही सत्तेत आले, तेथे देशविदेशांतील पर्यटकांचा ओघ प्रचंड वाढला. यंदा तेथील ङ्गट्यूलिप गार्डनफला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या दुपटीने वाढल्याचे आकडे नुकतेच समोर आले. पाकिस्तान आणि फुटीरतावाद्यांच्या डोळ्यात हे चित्र सलत होते. काही दिवसांपूर्वी बलोच बंडखोरांनी केलेल्या रेल्वे अपहरणामागे भारताचा हात असल्याचा कांगावा पाकिस्तानने केला आणि तेथील काही घटकांनी याचा बदला घेण्याची भाषा सुरू केली होती. या पार्श्वभूमीवर या हल्ल्याकडे पाहिले पाहिजे. विशेषतः अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स भारत दौऱ्यावर असताना ङ्गकाश्मिरात सारे आलबेल नाही,फहा संदेश देण्याचा केविलवाणा प्रयत्न या हल्ल्यामागे दिसतो. व्हान्स यांच्यासह अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि जगभरातील राष्ट्रप्रमुखांनी ताज्या हल्ल्याचा एकमुखी निषेध केल्याने या कथित संदेशाला अर्थ राहिलेला नाही. पंतप्रधान मोदी हे सौदी अरेबियाच्या भेटीवर असताना हा हल्ला झाला. गेल्या काही काळात भारताचे सौदी अरेबियासह आखाती देशांशी संबंध अधिक दृढ होऊ लागल्याने इस्लामी देशांमधूनही पाकिस्तानचे स्थान डळमळीत झाले आहे. त्याच नैराश्याचे प्रतिबिंब अशा घटनांमधून उमटते आहे. हा हल्ला केवळ पर्यटकांवरील नसून, काश्मीरच्या अर्थव्यवस्थेला हा मोठा धक्का आहे. ङ्गपर्यटक परतताना पाहून हृदय विदीर्ण झाले,फ या मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या प्रतिक्रियेतून पर्यटनावर रोजीरोटी चालणाऱ्या गोरगरीब काश्मिरी नागरिकांच्या भावनेचे प्रतिबिंब उमटले आहे. त्यामुळे काश्मिरात सुरक्षिततेची हमी देऊन पर्यटकांमध्ये पुन्हा विश्वास निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. या हल्ल्याचा सुगावा लागला नव्हता का, याचा तपास यंत्रणांकडून होईलच. या घटनेची गांभीर्याने घेतलेली दखल आणि उचललेली पावले पाहता सरकारकडून यापूर्वीच्या ङ्गसर्जिकल स्ट्राइकफ सारखी कारवाईही होऊ शकते. सारा देश वेठीस धरणाऱ्या दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रत्युत्तराबरोबरच कायमस्वरूपी उपायही महत्त्वाचे आहेत. त्या दृष्टीने भारताने वेगवेगळ्या आंतरराष्ट्र ीय व्यासपीठांवर पाकिस्तानला एकटे पाडले आहेच. पुढील महिन्यातील अमरनाथ यात्रेच्या तोंडावरच घडलेल्या या घटनेमुळे यात्रेकरूंना सुरक्षा पुरविण्याचे आव्हान सुरक्षा दलांपुढे आहे. हल्लेखोरांनी धर्म विचारून नागरिकांना लक्ष्य केले, त्यावरून देशाच्या एकात्मतेवर हल्ला करण्याचा त्यांचा हेतू लक्षात घेतला पाहिजे. अशा कृत्यांमुळे देशात धार्मिक विद्वेष वाढणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. धार्मिक उन्माद वाढवून भारताच्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण संरचनेला धक्का देण्याचा हा प्रयत्न ओळखायला हवा. अशा फुटीर शक्तींना बळ मिळता कामा नये.

# हिंदू म्हणजे कोण? आणि ब्राह्मण म्हणजे कोण? आता तरी समजून घ्या

सत्य कधीच लपत नाही, किंवा गाडल्या जात नाही आणि नष्ट ही केल्या जात नाही.काही झाले तरी त्याचा इतिहास लिहला जातो. आणि वेग वेगळ्या विचारधारेचे सत्य शोधक, संशोधन करून निर्भयपणे, निर्भीडपणे, निः पक्षपणे हा इतिहास पुरावे, संदर्भ गोळा करून इतिहास लिहत असतात.त्यावर विविध मध्यमा द्वारे चर्चासत्र, परीसंवाद, व्याख्यान आयोजित केली जातात. त्यातुन सत्य परिस्थिती समजून सांगितली जाते. काही वेळा सांस्कृतिक दहशत निर्माण करून सत्य परिस्थिती दाबल्या जाते.पण ती कालांतराने समोर येऊन उभी राहते. तेव्हा तिच्या विरोधात बंड करून जो उभा राहतो.क्रांतिकारी विचारांच्या चळवळीचा नायक ठरतो.समाजसेवक, महात्मा, महामानव ठरतो. हिंदू हा धर्म नाही, तर ती एक बहुमजली इमारत आहे, तिच्या प्रत्येक मजल्यावर रूम आहेत, त्याला दरवाजे खिडक्या आहेत, पण शिडी, पायऱ्या नाहीत.खालच्या मजल्यावरिल वरच्या मजल्यावर जाऊ शकत नाही. आणि वरच्या मजल्यावरिल खालच्या मजल्यावर येऊ शकत नाही. जो जिथे जन्मला तो तिथेच मृत्यू होईल. त्याचा रूम किंवा मजला बदली होऊ शकत नाही. त्याची अलिखित आचार संहिता म्हणजेच मनुवादी विषमतावादी विचाराचा हिंदू धर्म असे सोप्या भाषेत स्पष्ट सांगता येईल. हिंदू धर्मात किती जाती,पोट जाती आहेत,सहा हजार सहाशे जाती आहेत.त्यांना सांभाळण्यासाठी तेहतीस कोटी देवाची हातात शस्त्र घेऊन फौज उभी केली आहे.ते सर्व ब्राम्हणांच्या हातात व मंत्रात बंदिस्त आहेत. देव देवी पर्यंत पोचायचे असेल तर प्रथम ब्राम्हणांना दान दक्षिणा द्यावी लागते. तेव्हाच देव देवी प्रसन्न होतील त्यांनी तुमची समस्या सांगितली तरच देव,देवी येकुन घेतो.अशी ही हजारो वर्षांची परंपरा आहे, ती तोडण्याचे काम अनेकांनी केले. म्हणूनच ते महामानव, महात्मा, संत झाले. भारतात हिंदू कोण आहेत तर मराठा पासून ते आदिवासी पर्यंत जेवढ्या जाती आहेत त्यांना ब्राह्मण सोडून शिक्षणाचा नोकरीचा अधिकार नव्हता सर्व जातींना आपापल्या जातीची कामे करावी लागत होती.मराठा कुणब्यांना शेतीचं काम, कुंभाराला मडकी बनवणे, सुताराला लाकडी वस्तू ,न्हावी असेल तर केस कापणे, आगरी कोळ्याने मासे पकडणे, तेलीने तेल काढणे,धनगराने गवळीने शेळ्या मेंढ्या गुर ढोर सांभाळणे, दुधाचा व्यवसाय करणे म्हणजेच प्रत्येक जातीच्या माणसाने आपल्या जातीचं काम करणे हा मनू स्मूर्ती चं लिखित नियम होता. त्याचे संपूर्ण अधिकार फक्त ब्राम्हणांना होते.२६ जानेवारी १९५० नंतर भारतात भारतीय संविधान लागू झाले. संविधानानंतर ह्या सर्व मराठा, ओबीसी, एससी, एसटी महिलांना सर्व बहुजनांना शिक्षणाचा अधिकार मिळाला.त्यामुळे ते सर्व नोकरी करू शकले आणि त्यामुळे डॉक्टर, वकील, इंजिनियर, आमदार,खासदार,मंत्री बनू शकले. महिलांना घराच्या बाहेर पडून शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता.त्याच सर्व समाजाच्या महिला शिक्षण घेऊन देशाच्या सर्वोच्च पदी म्हणजे प्रधानमंत्री,राष्ट्रपती सह सर्वच पदावर त्यांना मान समान अधिकार आणि नोकरी मिळाली.संविधानाच्या अगोदर असं झालं नाही,संविधाना नंतर सर्वच क्षेत्रात समान अधिकार मिळू लागले ब्राह्मण हजारो वर्षापासून शिक्षण, नोकरी,हक्क,अधिकार भोगत होते.आणि आज ही वर्चस्व गाजवत आहेत.म्हणून आज तो तीन टक्केवाला समाज सर्व क्षेत्रात वरती कब्जा करून आहे,त्याला प्रथम सुरुंग महात्मा जोतिबा फुले,सावित्री बाई फुले यांनी लावला होता,तो महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य हे समाज सुधारणेसाठी एक महत्त्वपूर्ण योगदान होते. त्यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाचा पाया घातला. तसेच, त्यांनी सर्व जाती-धर्माच्या मुला-मुलींना शिक्षण मिळावे यासाठी संघर्ष करून प्रयत्न केले. त्यांच्या कार्यावर आधारित फुले हा सिनेमा देशात प्रदर्शित होत होता.त्याला देशात मनुवादी विचारांच्या संघटना बहुसंख्य मराठा मागासवर्गीय समाजाच्या वैचारिक मानसिक गुलामीमुळे डोकेवर काढत आहेत.पहिल्या त्या बॅनर लावण्यास घाबरत होत्या आता त्या उघड उघड धमक्या देऊ लागले. त्याचे उदाहरण सध्या फुले या बहुचर्चित चित्रपटाच्या प्रदर्शनावर मूठभर ब्राह्मण महासंघ बॅनर खाली महिलांनी व हिंदू महासंघाने घेतलेल्या आक्षेपांमुळे चित्रपटाचे प्रदर्शन लांबणीवर टाकण्यात आले आहे. ही हजारो वर्षाची सांस्कृतिक दहशत आज ही कायम आहे त्यांना दाखवून द्याचे होते ते त्यांनी दाखवून दिले.हा निर्णय फक्त एका चित्रपटाबाबत नसून,तो सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहावर घाला घालणारा आहे.तरी बहुसंख्य राजकीय दुष्टया जागरूक असलेला बहुसंख्य मागासवर्गीय समाज पेटून उठला नाही. फुले दांपत्यांनी शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले,जे पती-पत्नी म्हणून सामाजिक क्रांतीचे अग्रदूत ठरले,त्या सावित्रीबाई व जोतिराव फुल्यांच्या जीवनावर आधारित असलेल्या कलाकृतीला विरोध का?.फुले दाम्पत्याने ब्राह्मणशाही , वर्णव्यवस्थेचा, अंधश्रद्धेचा आणि धर्मसत्तेचा ज्या ठामपणे पर्दाफाश केला.ते सत्य आजही काही उच्चवर्णीय ब्राह्मण व हिंदू संघटनांना झेपत नाही. त्यांच्या डोळ्यात खुपणारे सत्य समोर येऊ नये,म्हणून हे संघटनात्मक दबाव टाकले जात आहेत.ही केवळ अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा नाही, तर संपूर्ण बहुजन समाजाच्या विचारमूल्यांवर घाला आहे.चित्रपटात काय चुकीचं दाखवलं गेलं आहे?.एखाद्या तपशीलावर आक्षेप असल्यास,तो सेन्सॉर बोर्डासमोर मांडावा ना.मग संघटनांचा हस्तक्षेप कशासाठी? ब्राह्मण समाजाच्या व हिंदू धर्माच्या नावाने अशा प्रकारे विरोध करणाऱ्या संघटना सर्व ब्राह्मणांचे प्रतिनिधित्व करतात का?. या प्रश्नांची उत्तरं शोधली तर एक गोष्ट स्पष्ट होते. ही लढाई कलाविषयक नसून, सामाजिक सांस्कृतिक वर्चस्वाच्या पुरस्कर्त्यांची आहे.फुले हे नाव उच्चारणंही ज्यांना जड जातं,त्यांना त्यांच्या विचारांचा प्रसार होणं खटकणारच! बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय ओबीसी प्रथम हिंदू असतो तो आता झोपला आहे. तो जागा झाला,तर काय होईल हे ब्राह्मण महासंघ व हिंदू महासंघाने लक्षात ठेवावे. आता काळ बदलतोय. आजचा बहुजन तरुण विचार करतोय, अभ्यासतोय.सोशल मीडियावरून, पुस्तके व चित्रपटांमधून त्याला सत्य शोधायचं आहे.त्यामुळे अशा प्रकारचा विरोध जितका वाढेल, तितका ङ्गफुलेफ अधिक लोकांपर्यंत पोहोचतील. म्हणून हे लक्षात ठेवा चित्रपट प्रदर्शित पुढे-मागे होईल,पण फुले दांपत्याच्या विचारांची क्रांती थांबणार नाही.कारण ही लढाई एका चित्रपटाची नाही ती समतावादी विचारांची समतेच्या स्वप्नांची आहे.यातून बहुसंख्य बहुजन म्हणजेच मागासवर्गीय समाजाने स्वताला हिंदू म्हणून घेतांना त्यामागील इतिहास समजून घेतला पाहिजे.म्हणजेच तुम्ही हिंदू कधी असता आणि जातीचे कधी होता.म्हणूनच विचारतो हिंदू म्हणजे कोण?. आणि ब्राह्मण म्हणजे कोण?. आता तरी समजून घ्या

# संपत्तीसाठी नात्यामधील माणुसकी हरवली!

मानवी जीवनात संपत्ती, पैसा हेच सर्वस्व नसून आपली माणसं आणि नातेसंबंध सुद्धा महत्वाचे असतात.नियत चांगली असेल तर मूलभूत गरजा भागविण्यासाठी जीवन पद्धती चांगल्या पद्धतीने जगता येईल. थोड्याशा संपत्तीसाठी माझ्या घरातील माणसांची नियत बदलली आमची वडिलोपार्जित पाच एकर शेतजमीन होती संपत्तीच्या अर्थात दोन अडीच एकर शेतजमीन हडपण्यासाठी माझ्या रक्तातील नात्याला म्हणजे सख्या भावाचे पवित्र नात्याला गढूळ करण्याचा नालायकपणा माझ्या स्वतःच्या घरात घडलेला आहे. नात्यापेक्षा संपत्ती हेच सर्वस्व मानणारे सुध्दा मला बघायला मिळाले आहेत.माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर अनेक वर्षांनी माझ्या सख्या काकांनी चुलत भाऊ आणि चुलत भावाच्या सासऱ्याच्या मदतीने खोटे दस्तऐवज मृत्यूपत्र सासऱ्याच्या गावात म्हणजे बाह्य जिल्ह्यात नोंदणीकृत करून माझ्या हिस्स्याची शेतजमीन हडपण्याचा केविलवाणा प्रयत्न केला होता. मला या प्रकरणाची माहिती मिळताच मी संबंधित कार्यालयाकडून दस्तऐवजाची नक्कल आणून त्यांचा तो लबाड कावेबाज डाव हाणून पाडला नंतर रक्ताचे नातेसंबंध गढूळ करणाऱ्या नैतिकता,नीतिमत्ता, प्रामाणिकतेला तिलांजली देणाऱ्या माझा विश्वासघात करून पाठीत खंजीर खूपसणाऱ्या संपत्तीसाठी नात्यात कटुता निर्माण करणाऱ्या मानवतावादी धर्म आणि माणुसकीला लाथाडणाऱ्या वाईट प्रवृत्ती असलेल्या धोकेबाज लोकांसमवेत उर्वरित आयुष्य काढणे माझ्यासाठी आणि माझ्या मुलांसाठी योग्य ठरणार नाही असा दूरदृष्टीने विचार करून त्याचवेळी नात्यामध्ये विश्वास नसल्याने आणि विश्वासघात करणारे नातेवाईकांपासून अलिप्त राहावे याचा विचार करून मला नाईलाजाने इच्छा नसतांना सुद्धा भाऊबंदकी आणि नातेसंबंध तोडावे लागले भविष्यात वादविवाद टाळण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या हिस्स्याची शेतजमीन हडप



प्रमोद सूर्यवंशी
चिखली,मातृतीर्थ बुलडाणा.
मो.८६०५५६९५२१

करण्यासाठी खोटा दस्तऐवज तयार केल्याची कबुली जवळच्या नातेवाईकांसमोर दिल्या नंतर मी माझ्या हिस्स्याची शेतजमीन कवडीमोल भावात विक्री केली आहे.या प्रकरणाशी संबंधित कायदेशीर पुरावे माझ्या कडे उपलब्ध आहेत. थोड्याशा संपत्तीसाठी रक्ताचे नातेसंबंध, माणुसकीला आणि मानवतावादी धर्माला विसरून नातेसंबंध गढूळ करणारे जवळचे नातेसंबंध विसरलेले सुद्धा माझ्याच आजूबाजूला दडलेले होते. सत्य परिस्थिती आहे आपलीच रक्तातील नात्यातील जवळची माणसं संपत्तीसाठी किती खालच्या थराला जाऊ शकतात किती क्रूर पध्दतीने वागू शकतात याचा अनुभव आला आहे. नातेसंबंध, भाऊबंदकी, सगेसोयरे यापेक्षा थोड्याशा संपत्तीला महत्व देणारी माणसं बघायला मिळाली. आयुष्यभर मनात एक खंत राहील कि, थोड्याशा संपत्तीसाठी नात्यामधील माणुसकी सुध्दा हरवली.

# वाचाल तर वाचाल

माणसाला कुठला ना कुठला छंद हा हवाच . जेणेकरून त्या छंदात आपले मन तो रमवू शकेल .एकतर वाचन अन्यथा इतर छंद . प्रत्येक जण आपापल्या मातृभाषेतून वाचन करू शकतो . त्यामुळे ते वाचायला आणि समजायला पण सोपे जाते . तसे तर प्रत्येक भाषेत साहित्य हे उपलब्ध असतेच . पण मला असे वाटते की मराठी भाषेत वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य खूप उपलब्ध आहे . वाचनाने ज्ञान तर मिळतेच . पण एक छान मित्र देखील मिळतो . बरेचदा वाचन करत असताना असे जाणवते की ते आपल्याविषयी , आपल्या कुटुंबाविषयी , आपल्या मित्र मैत्रिणींविषयी यात लिहिले आहे काय ! म्हणून वाचताना आपण त्यात जास्त गुंग होतो . आपल्याला एक नवीन दिशा मिळते .

खरंतर या धावपळीच्या जीवनात आपले छंद जोपासायला वेळ कुठे मिळतो ? पण वाचन हे वेड असे आहे की आपण एखादे पुस्तक कधीही , कुठेही अगदी प्रवासात देखील वाचू शकतो . त्यातही भर म्हणजे मोबाईल. त्यामुळे आपण खूप कमी वेळ पुस्तक हातात घेऊन वाचतो . आपल्याला स्वत:लाच वाचनाचे वेड असेल तर कुटुंबातील सर्वांनाच याची आवड निर्माण होते . इतर कार्यक्रमात भेट म्हणून देत असताना प्राधान्याने पुस्तकांचा विचार आधी व्हावा असे वाटते . काल माझ्या पाहण्यात आले की लग्नात रुखवतात पुस्तकेच होती . ही संकल्पनाच खूप छान वाटली . आजकाल घरं इतकी छोटी असतात की आपण हौशीने केलेल्या वस्तू कुठेतरी अडगळीत पडतात . आणि बाजारात देखील आपल्याला छान छान हव्या त्या वस्तू भेटतात . की ज्या वस्तू आपण आपल्या घराप्रमाणे सजवू शकतो . त्यामुळे ही संकल्पना खूप आवडली . प्रत्येक वयोगटातील व्यक्तींसाठी व त्यांच्या आवडीनुसार आपल्याकडे तशा प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे . मी तर सर्वांनाच पुस्तकं भेट देत असते . महिन्यातून किमान पाच सहा पुस्तक तरी खरेदी करतेच .

आपल्या वाचनाच्या छंदामुळे कुणाला त्रासही होत नाही . आपली पुस्तक विकत घेण्याची ऐपत नसेल तर आपण सार्वजनिक वाचनालयात जाऊन देखील आपण आपला छंद जोपासू शकतो . आजकाल प्रदर्शनात पुस्तकांच्या किमती पण खूप कमी असतात . तिथूनही आपण खरेदी करू शकतो . ज्ञानाची भूक तर भागतेच . वाचनाने पण मन प्रसन्न देखील होते . लांबचा प्रवास करत असू तर तो कंटाळवाणा न वाटता वेळ कसा जाईल ते समजणार देखील नाही . मित्र, कुटुंब सगळे सगळे कंटाळतील . पण पुस्तक कधी कंटाळणार नाहीत .

उत्तमोत्तम पुस्तकांच्या वाचनाने ज्ञानार्जन तर होईलच पण वाचनाने मिळणारा आनंद शब्दात सांगता नाही येणार . खेरीज व्यक्तीचा सर्वांगीण विकास देखील होईल .

वाचनामुळेच माणसाची विचारशक्ती , कल्पनाशक्ती , संवेदनशक्तीचा विकास होताना दिसतो . आपल्या मनावर वाचनाने संस्कार देखील घडतात . वाचनाचा आनंद हा नक्कीच श्रेष्ठ आनंद आहे असेच म्हणावे लागेल .

पुस्तक वाचनाने स्मरणशक्ती देखील वाढते .आपला आत्मविश्वास वाढतो . यामुळे भविष्याचा मार्ग देखील सापडतो . काळाची गरज म्हणून वाचन केले पाहिजे . वाचनाने आपल्याला येणा-या प्रत्येक अडचणींवर मार्ग काढता येतो . अवांतर वाचनाने आपल्यात असणारे अज्ञान दूर होते . खरंतरं प्रत्येक क्षेत्रातील वाचन केले पाहिजे . सगळ्याच क्षेत्रातील ज्ञान असणे आवश्यक आहे . म्हणजे पुढे जाऊन आपण फसवले जाणार नाही .

वाचाल तर वाचाल अशी एक म्हण आपल्याकडे प्रचलित आहे .

वाचनाने आयुष्य बदलते .वाचनाने आपल्याला आकर्षक विषय , संस्कृती व दृष्टीकोन समजतात . व त्याप्रमाणे आपण आपल्यात बदल घडवून आणू शकतो .

आपले आयुष्य घडवण्यात पुस्तकांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. पुस्तके हे ज्ञानाचा स्रोत तर असतातच, परंतु त्याच सोबत ते आयुष्यातील प्रेरणा, मनोरंजन आणि अनेक गोष्टींशी संबंध प्रस्थापित करण्याचे काम सुद्धा करतात. ते आपल्या अनुभवांमध्ये आणि भावनांमध्ये एक वेगळा दृष्टीकोन देतात. आपल्याला विचार करण्यास शिकवतात . पुस्तके आपल्याला आपले टीकात्मक विचार, संवाद आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करण्यास मदत करू शकतात. वाचनामुळे कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि शिकण्याची आवड देखील विकसित होते. पुस्तकं आपल्या विश्वासांना आव्हान देऊ शकतात. व्यक्तीचा वैयक्तिक विकास आणि परिवर्तन घडवून आणू शकतात.

दरवर्षी २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिवस म्हणून साजरा केला जातो.

पुस्तके ही भूतकाळ आणि भविष्य यांना जोडणारा दुवा असतो. अनेक पिढ्यान पिढ्या आणि संस्कृतीं मधील तो एक पूल आहे . आपल्याकडे इतक्या विविध भाषा आहेत आणि त्या भाषेतही खूप मोलाचे साहित्य उपलब्ध आहे . लहान मुले आणि बहुतांश लोक हे मातृभाषेत वाचण्यास जास्त प्राधान्य देतात.

यावर्षीच्या जागतिक पुस्तक दिनाची थीम आहे तुमच्या पद्धतीने वाचा. जी मुलांना त्यांच्या स्वतःच्या शैलीत आणि आनंदासाठी वाचन करण्यास प्रोत्साहित करतात. प्रत्येकाला जे वाचल्याने छान वाटते ते त्याने वाचावे. त्यातून आनंद मिळवावा. वाचनासाठी किंवा वाचनामुळे ताण येवू नये. वाचन महत्त्वाचे आहे . कारण ते आपले मन विकसित करते . आणि जीवनाचे भरपूर ज्ञान आणि धडे देते. पुस्तकांमुळे आपल्याला आपल्या सभोवतालचे जग चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत होते . वाचनामुळे आपला शब्दसंग्रह वाढतो आणि संवाद कौशल्य विकसित होते . असा धरी छंद । जाई तुटोनिया भावबंध॥ ही संत माहात्म्यांची शिकवण खूप काही सांगून जाते .

कु . छाया उंब्रजकर
सोलापूर

# शब्दमैफिलने सजली कविता संध्या




(छ. संभाजीनगर) रोहिणी पब्लिकेशन प्रस्तुत, शिवछत्रपती महाविद्यालय इथे 'शब्दमैफिल' ओपन माईक शो मोठ्या उत्साहात दिनांक २०.०४.२०२५ रोजी संपन्न झाला.यावेळी छ. संभाजीनगरसह इतर जिल्ह्यातील व परीसरातील नवोदितसह नामांकीत कवी यांची कवितांची सुरेख मैफिल रंगली. कवयित्री प्रतीक्षा तीतकारे, निवास, ऋषीकेश अव्हाळे आणि रेणुका गोह्लार यांनी आपल्या स्वमधूर व खुमासदार शैलीत सूत्रसंचालन करत मैफिलीची रंगत वाढविली. दरम्यान,ओपन माईक शब्द मैफिल मध्ये कवी योगेश सोनवणे, जयश्री अहेर, राहुल साळवे, अर्णव जयंत, कृष्णा डांडनाईक, अनुराधा वाकळे, मंजुषा कवटेकर, अल्केश अडकिने, शुभम जाधव, विक्रम जाधव, ताजकृष्ण वाघमारे, वैश्नवी जाधव, कृष्णा भालेराव, स्नेहा खोडके, रेणुका गोह्लार, गीता खरात, ऋषिकेश अव्हाळे, देवन्त खांडखुळे, सचिन पवार, आदित्य गोमटे, सागर थोरात, अरुण महाजन, पूजा चव्हाण, हरिओम देशमुख आणि प्रिया सोनवणे यांनी आपल्या कवितांनी सादर करीत प्रेक्षकांची दाद मिळवली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व टिम याचे योगदान मोलाचे ठरले. सदर कार्यक्रमात डॉ.वैजनाथ कदम सरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली,तर रोहिणी पब्लिकेशन च्या सर्वेसर्वा कुमारी. रोहिणी माया रामू वाघमारे मॅम यांनी त्यांच्या जीवन प्रवासावर कविता सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. रोहिणी प्रकाशन मुंबई प्रस्तुत 'शब्द मैफिल ओपन माईक शो' कार्यक्रमास छ. संभाजीनगर येथील प्रेक्षकांनी भरगोस प्रतिसाद दिला.
लिखाण: कुमारी - रेणुका विनोद गोह्लार

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

रविवार २७ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com


# वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता ; हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना

नांदेड प्रतिनिधी:- किशन चुंचलवाड नांदेड दि. 25 एप्रिल :- प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी आज दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दिनांक 25 व 26 एप्रिल हे दोन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. 25 एप्रिल रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 30 ते 40 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची तसेच तुरळक ठिकाणी वातावरण उष्ण व दमट राहण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. शनिवार 26 एप्रिल 2025 रोजी तुरळक ठिकाणी ताशी 50 ते 60 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह गारपीट होण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे. या गोष्टी करा विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. नया गोष्टी करु नका आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे, असेही आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे. 00000

## गणेश गाडेकर यांची महाराष्ट्र शासनाच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्राध्यापक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार



जालना/प्रतिनिधी जालना तालुक्यातील उमरी येथील गणेश मथुरा रंगनाथ गाडेकर यांची महाराष्ट्र शासनाच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्राध्यापक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.सत्कार करतांना राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष कृष्णा गाडेकर.वक्ता सेलचे जिल्हाध्यक्ष संदीप गाडेकर. विष्णु गाडेकर.संदीप गाडेकर.पवन गाडेकर आदी उपस्थित होते.

## भिगवणच्या राहुल कदमची इंदापूर परीट समाज युवक अध्यक्षपदी निवड



भिगवण: इंदापूर तालुका परीट समाज युवक अध्यक्षपदी भिगवण ( ता.इंदापुर) येथील राहुल दत्तात्रय कदम यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र धोबी परीट सेवा मंडळची पुणे जिल्हा निवड समितीची इंदापूर येथे पुणे जिल्ह्यातील संपूर्ण तालुकाच्या आढावा बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत राहुल कदम यांची इंदापूर तालुका परीट समाज युवक अध्यक्षपदी निवड व्हावी अशा प्रकारची सूचना मांडण्यात आली. बैठकीत सर्वांमते चर्चा होऊन राहुल कदम यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले त्यानंतर पुणे जिल्हाध्यक्ष विकासराव अभंग यांनी राहुल कदम यांना इंदापूर तालुका युवक अध्यक्ष निवडीचे पत्र दिले. यावेळी कल्पना गायकवाड, अक्षय कदम, संगीता ननवरे, सुभाष दळवी, मनोज नांगरे, राकेश कदम, हनुमंत घोडके आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवडीनंतर बोलताना राहुल कदम यांनी सांगितले की संघटनेच्या माध्यमातून समाजातील तरुणांना संघटित करून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम मी प्रामाणिकपणे करणार आहे.



जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचेकर्मचारी स्वर्गीय सुरेश जाधव यांच्या परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाच्या वतीने आर्थिक मदतीचे वाटप शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष

## पहलगाम हल्ल्याप्रकरणी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने निषेध.

वाशिम(प्रतिनिधी) जम्मू काश्मीर येथील पहेलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मां.खासदार संजयजी देशमुखसाहेब , जिल्हा सहसंपर्क प्रमुख डॉ.सुधीर कवर जिल्हा प्रमुख मा.सुरेश मापारी साहेब, जिल्हा संघटक मा.गजाननजी देशमुख साहेब, युवाजिल्हाप्रमुख नितिन मडके साहेब, उपजिल्हाप्रमुख साहेब, शहरप्रमुख गजानन भांदुर्गे, डॉ सिद्धार्थ देवळे , उपतालुका प्रमुख वाशिम गजानन जैताडे,युवासेना




शहरप्रमुख आशिष इंगोले यांच्या नेतृत्वाखाली शहरातील पाटनी चौकात निषेध नोंदवण्यात आला. यावेळी पहलगाम प्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. शिवसैनिकांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे पाटनी चौक परिसर दणाणून गेला होता. केंद सरकारने फक्त कश्मिर बाबतीत दिखावा निर्माण केला जर योग्य उपाययोजना केल्या असत्या तर सर्व सामान्य नागरिकांनचे नाहक बळी गेले नसते अशी प्रतिक्रिया खासदार संजय देशमुख साहेब यांनी या आंदोलनादरम्यान दिली. आदीसह बहुसंख्येने पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## मोठी बातमी! अखेर कुणाल कामराची होणार चौकशी



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल विडंबनात्मक गाणं सादर केल्याप्रकरणी अखेर कॉमेडियन कुणाल कामराची पोलिसांकडून चौकशी होणार आहे. कुणालची चेन्नईमध्ये चौकशी करण्यास मुंबई पोलिसांना परवानगी देण्यात आली आहे. मुंबई पोलीस चेन्नईला जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने कुणाल कामराचा जबाब नोंदवणार आहेत. या प्रकरणात पोलीस कामराला प्रत्यक्ष पोलीस ठाण्यात उपस्थित राहून जबाब नोंदविण्यास समन्स पाठवत आहेत. परंतु कामरा पहिल्या दिवसापासून व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे आपला जबाब नोंदवण्यास तयार आहे, असा युक्तीवाद त्याच्या वकिलांनी सुनावणीदरम्यान केला होता. त्यानंतर चेन्नईला जाऊन त्याची चौकशी करण्याची परवागनी मुंबई पोलिसांना देण्यात आली आहे.

## दिग्दर्शक विशाल बेर्डे यांच्या 'वाली' चित्रपटाचे पोस्टर अनावरण






दि. 22 एप्रिल 2025 रोजी खरवडी येथे दिग्दर्शक श्री. विशाल बेर्डे यांच्या 'वाली' चित्रपटाचे पोस्टर सार्वजनिकपणे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्य उपस्थितीमध्ये दिग्दर्शक श्री. विशाल बेर्डे, श्री. गणेश तुरकने, श्री. नितीन कांबळे, श्री. अनिल गंगावणे, श्री. भीम अलोट, खरवडी गावचे सरपंच श्री. गोरख शिंदे, पत्रकार श्री. बाबू नाना भोंगे, श्री. अमोल कनगरे, श्री. बाळासाहेब कुन्हे यांच्यासोबत 'वाली' चित्रपटातील मुख्य नायक श्री. नितीन भूतांबरे, नायिका नंदिनी सोनवणे, अशोक ठोंबरे व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात दिग्दर्शक श्री. विशाल बेर्डे यांनी आपल्या चित्रपटाच्या प्रदर्शनाबद्दल बोलताना सांगितले की, "हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून, प्रेक्षकांनी आपल्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन या चित्रपटाचा आनंद घ्यावा." 'वाली' चित्रपटाने खरवडी येथे पोस्टर अनावरणानंतर मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय बनला असून, या चित्रपटाची प्रतीक्षा प्रेक्षकांसाठी अधिकच वाढली आहे.

## मा.श्री.अंजेभाऊ चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा परिषद महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार



प्रतिनिधी/जालना-तालुक्यातील पाहेगाव येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.अंजेभाऊ गुलाब चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा परिषद महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मा.आ.तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अरविंद अण्णा चव्हाण यांच्या तर्फे पार्टी कार्यालय जालना येथे समाधान राठोड व संदीप राठोड यांनी सत्कार केला. यावेळी सुरेश चव्हाण (उपसरपंच),राम चव्हाण(ग्रा.सदस्य),माणीक राठोड(उपसरपंच),संदिप जाधव उपस्थित होते.

## उज्वल व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्राच्या संचालिका मा. उषा घोडेस्वार, व्यवस्थापक मा. शिलवंत घोडेस्वार व प्रमुख मा. गंगाधर धुवाधपारे यांना छत्रपत्री शिवाजी महाराज पुरस्कार २०२५



दैनिक मीडिया वार्ता न्यूज महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक १६/०४/२०२५ रोजी राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार सोहळ्याचे आयोजन महात्मा फुले सभागृह, पनवेल जिल्हा रायगड येथे करण्यात आले. वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील मान्यवरांचे येथे पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. येथे उज्वल व्यसनमुक्ती केंद्र साकोली जिल्हा भंडारा संचालिका मा. उषा घोडेस्वार, केंद्राचे व्यवस्थापक मा. शिलवंत घोडेस्वार व केंद्र प्रमुख मा. गंगाधर धुवाधपारे यांना आदर्श समाजसेवक विशेष व्यसनमुक्ती सेवा सन्मान पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात याले. या सन्मान सोहळ्याप्रसंगी जेष्ठ नेते, माजी खासदार मा. रामशेखर ठाकूर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. संजय बांगर सर, जिल्हा बँक कार्यकारी अधिकारी मा. मंदार सर, दैनिक मीडिया वार्ता न्यूजचे मुख्य संपादक मा. भागुराम सावंत, दैनिक मीडिया वार्ता न्यूजचे सह संपादक मा. मनोज खोब्रागडे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा अत्यंत सन्मानपूर्वक पार पडला.

## संत सेना महाराज यांनी सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक सुधारणांवर भर दिला - आ.अब्दुल सत्तार.

सिल्लोड प्रतिनिधी :- दि.25, संत सेना महाराज यांनी सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक सुधारणांवर भर दिला आणि लोकांना समतेचे, न्यायाचे आणि भक्तीचे महत्त्व शिकवले. संतांचे कार्य हे सर्वसमावेशक होते, संत केवळ एका विशिष्ट समाजासाठी किंवा धर्मासाठी नसून, सर्व मानवजातीसाठी होते असे प्रतिपादन आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले. संत सेना महाराज यांच्या जीवन चरित्रावर अनेक साहित्य उपलब्ध आहेत. त्याचे प्रत्येकाने वाचन करावे त्यातून संत सेना महाराज व आपल्या संत परंपरेचा इतिहास लक्षात येईल असे मत त्यांनी व्यक्त केले. सिल्लोड येथे संत शिरोमणी संत सेना महाराज जयंती सोहळा निमित्त येथील राजर्षी शाहू महाराज सामाजिक सभागृह येथे नाभिक समाज मेळावा कार्यक्रमात आ. अब्दुल सत्तार बोलत होते. याप्रसंगी समस्त नाभिक समाजाच्या वतीने आ. अब्दुल सत्तार यांना संत सेना महाराजांची प्रतिमा भेट देवून भव्य सत्कार करण्यात आला.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर, कृउबा समितीचे संचालक श्रीरंग पा. साळवे, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, तालुकाप्रमुख मारोती पा. वराडे, शहरप्रमुख मनोज झंवर, नाभिक समाज मंडळाचे जिल्हाध्यक्ष संतोष बोराडे, तालुकाध्यक्ष राजू सुरडकर, शहराध्यक्ष दीपक वाघ, माजी नगरसेवक सुधाकर पाटील, प्रशांत क्षीरसागर, राजू गौर, जगदीश बेदवे, व्यापारी महासंघाचे दुर्गेश जैस्वाल, अमृतलाल पटेल, आशिष कटारिया आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलत असतांना आ. अब्दुल सत्तार म्हणाले की, नाभिक समाजाने आपल्या पाल्याला उच्च शिक्षण द्यावे, सिल्लोड व



भराडी येथील संत सेना महाराज मंदिर परिसरात विकास कामे केली. सिल्लोड येथे नाभिक समाजाची स्मशानभूमी विकसित केली. शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी सर्व समाजाला न्याय दिला. प्रत्येक समाजाला घेवून राज्य सरकार काम करीत आहेत. नाभिक समाजाच्या विविध अडचणी सोडवण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करू, विश्वकर्मा प्रशिक्षण योजना, संत सेना महाराज महामंडळ या माध्यमातून नाभिक समाजाला देण्यात येणारे अर्थसहाय्य साठी असलेल्या जाचक अटी दूर करून समाजाला अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना सूचित करणार असल्याचे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

सलून किटचे वाटप

दरम्यान संत सेना महाराज जयंती निमित्त लोकनेते आ. अब्दुल सत्तार मित्र मंडळाच्या वतीने या कार्यक्रमात तालुक्यातील नाभिक समाजातील व्यावसायिकांना आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते सलून किटचे वाटप करण्यात आले. या किट मध्ये सलून व्यवसायासाठी लागणाऱ्या सर्व साहित्याचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत सेना महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन नाभिक समाजाचे तालुकाध्यक्ष राजू सुरडकर यांनी केले. प्रस्तावित जिल्हाध्यक्ष संतोष बोराडे यांनी तर शेवटी शहराध्यक्ष दिपक वाघ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास दिगंबर वाघ, कृष्णा वाघ, दिलीप वाघ ,सुभाष लोणकर, संतोष वाघ ,अक्षय वाघ ,अशोक वैद्य, ज्ञानेश्वर शिंदे, रत्नाकर वाघ ,अशोक बिडवे ,राम तसेवाल ,विश्वास सुरडकर ,अतुल वाघ ,कचरू सुरडकर ,संदीप वर्पे, सुधाकर पंडित ,सुखदेव सोळुंके, दिनेश बोराडे, गोकुळ पिंपळे, रंगनाथ शिंदे ,दीपक वरपे ,विलास वाघ, कैलास वाघ, पंडित बोर्डे ,जगन्नाथ कुदळ , फहिम पठाण आदींसह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## विष्णु सहस्त्रनाम आणि सारामृत यामधून आत्मसाक्षात्काराचा मार्ग" - ह.भ.प प्रज्ञाताई पंडित

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त श्री अनंतकोटी ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज मठ, नांदूरशिंगोटे येथे आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध निरुपणकार प्रा. प्रज्ञाताई पंडित यांचे "विष्णु सहस्त्रनाम आणि स्वामी समर्थ सारामृत" या स्तोत्रसाधनेवर अभ्यासपूर्ण व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाचे आयोजन मठाचे मठाधिपती मा. श्री. प्रदीपदादा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमात परिसरातील भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्याख्यानात प्रा. प्रज्ञाताई पंडित यांनी विष्णू सहस्त्रनाम आणि सारामृत ग्रंथावर सखोल चर्चा केली. त्यांनी या स्तोत्रांचे धार्मिक, आध्यात्मिक आणि जीवनातील महत्व स्पष्ट केले. त्याच्या साधनेची महती सांगून भक्तांना या ग्रंथांच्या माध्यमातून जीवनात शांती आणि सुख मिळवण्याचे मार्गदर्शन केले. प्रा. प्रज्ञा पंडित या मागील अनेक वर्ष विष्णू सहस्त्रनाम, श्री सूक्त, देवी सूक्त, रामरक्षा, भगवद्गीता, मल्हार स्तोत्र, सारामृत ग्रंथ तसेच इतरही सर्व हिंदू धर्मातील स्तोत्रांचे महाराष्ट्रभर निरूपण करत आहेत. जगभरातील अनेक हिंदू धर्मीय भक्तांना त्या त्यांच्या 'प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग' या ऑनलाइन स्तोत्र वर्गात वेद पुराणातील स्तोत्र शिकवतात. या व्याख्यानाला दैनिक राज आनंद , अहिल्यानगरचे संपादक श्री विठ्ठल शिंदे तसेच व्याख्यानाचे समन्वयक आणि बीड येथील दैनिक लोकप्रभा या वृत्तसंस्थेचे उपसंपादक श्री नितीन क्षीरसागर यांचीही उपस्थिती लाभली.







## डॉ.उज्जैनकर व श्री बाळूभाऊ ईटणारे यांचा समृद्धी महिला पतपेढी, शेगाव येथे झाला सत्कार



शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर जिल्हा जळगावचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी नुकतेच श्री समृद्धी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शेगाव जिल्हा बुलढाणा येथे सदिच्छा भेट दिली याप्रसंगी त्यांचा गुलाब बुके देऊन पतपेढीचे व्यवस्थापक श्री सुरेंद्र धनोकार साहेब यांनी डॉ. उज्जैनकर व उज्जैनकर फाउंडेशनचे बुलढाणा जिल्हा समन्वयक तथा उज्जैनकर सर यांचे व्याही श्री बाळूभाऊ इटनारे यांचा गुलाब बुके देऊन सत्कार केला याप्रसंगी पतपेढीचे कर्मचारी श्री कैलासभाऊ दाभाडे उपस्थित होते. उज्जैनकर फाउंडेशनच्या आयोजित तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन आळंदी देवाची जिल्हा पुणे येथे 4 जानेवारी 2025 रोजी भव्य आणि ऐतिहासिक संमेलन संपन्न झाले या प्रसंगी या पतपेढीचे या संमेलनाला 25 ट्रॉफीचे सौजन्य मिळाले होते त्यामुळे या प्रसंगी डॉ. उज्जैनकर व श्री बाळू इटणारे यांनी पतपेढीचे व्यवस्थापक श्री सुरेंद्र धनोकार साहेब यांना आदिशक्ती संत मुक्ताईचा फोटो,प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सुद्धा गौरव केला. या पतपेढीच्या संचालिका तथा उज्जैनकर फाउंडेशनच्या बुलढाणा जिल्हा उपाध्यक्षा मा. पूजाताई खेते यांचे सहकार्य लाभले होते.

# पहलगाम हल्ल्यानंतर एकनाथ शिंदे यांचा मोठा निर्णय; सर्व स्तरातून होतंय कौतुक

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी नाव विचारत गोळीबार केला, या घटनेत 26 जणांचा मृत्यू झाला आहे, ज्यामध्ये महाराष्ट्रातील देखील सहा जणांचा समावेश आहे. या घटनेनंतर संपूर्ण देशभरात संतापाची लाट आहे, या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आहेत, दरम्यान हा हल्ला जेव्हा झाला, त्यावेळी आदिल सय्यद हुसेन हा तरुण देखील तिथेच होता, त्याने तेथील पर्यटकांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र दहशतवाद्यांनी त्याच्यावर देखील गोळीबार केला. या घटनेत त्याचाही मृत्यू झाला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेनंतर आता आदिल हुसेन याच्या कुटुंबाला घर बांधून देण्याचा निर्णय घेतला आहे. काश्मीरच्या पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला. पर्यटकांना खच्चरवरून ने -आण करणाऱ्या आदिल सय्यद हुसेन याचाही या घटनेत मृत्यू झाला होता. त्यानंतर आता शिवसेनेच्या



पदाधिकाऱ्यांनी आज आदिलच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे. त्याच्या कुटुंबाचं सांत्वन केलं. दहशतवाद्यांनी जेव्हा गोळीबार केला, तेव्हा त्याला आदिलने विरोध केला होता. त्याने दहशतवाद्यांची बंदूक हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र या घटनेत त्याचा देखील मृत्यू झाला. त्याच्यावर देखील गोळीबार करण्यात आला. दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोनवरून आदिल हुसेनच्या कुटुंबाशी संवाद साधला, तसेच त्याच्या कुटुंबाला घर बांधून देण्याचा निर्णय एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या या दहशतवादी हल्ल्यानंतर आता भारत सरकारनं पाकिस्तानविरोधात मोठी कारवाइ केली आहे. सिंधू नदी पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आली आहे, अटारी बॉर्डर बंद करण्यात आली आहे, तसेच सर्व पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. त्यांना भारत तातडीनं भारत सोडण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत. दुसरीकडे भारताच्या या कारवाईने पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे, पाकिस्तानकडून भारतासोबतच्या व्यापारावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच पाकिस्तानच्या बाजुची वाघा बॉर्डर देखील बंद करण्यात आली आहे.

# १०वी-१२ वीच्या विद्यार्थ्यांनो इकडे लक्ष द्या:या दिवशी लागणार निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळतर्फे घेण्यात आलेल्या दहावी __बारावीच्या 21 लाख विद्यार्थ्यांच्या निकालाबद्दल एक महत्वाची माहिती समोर आली आहे. 10वी-12 वीच्या विद्यार्थांचा लवकरच निकाल लागणार आहे. मे महिन्यात या दोन्ही परीक्षांचा निकाल जाहीर होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा, तर दुसऱ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर होईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे देण्यात आली. या निकालाच्या तारखा लवकरच जाहीर केल्या जातील असेही बोर्डाकडून सांगण्यात आले. 15 मे पर्यंत निकाल लागू शकतो. मात्र यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांचीही धडधड वाढली आहे. फेब्रुवारीत सुरू झाली परीक्षा यावर्षी 11 फेब्रुवारी ते 18 मार्च पर्यंत 12 वीची परीक्षा झाली होती. यंदा एकूण 15 लाख 5 हजार 37 विद्यार्थ्यांनी 12वीची परीक्षा दिली. 3 हजार 373 परीक्षा केंद्रावर ही परीक्षा पार पडली. तर इयत्ता 10 वी ची परीक्षा 21 फेब्रुवारी रोजी सुरू झाली ती 17 मार्चपर्यंत होती. विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेसाठी पुरेसा वेळ मिळावा, या हेतूने बोर्डाने यंदाच्या वर्षी



परीक्षा आधीच घेतल्या आणि निकालही लवकर जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता मे महिना संपायच्या आतच दोन्ही (10वी , 12वी) इयत्तांचे निकाल लागणार असून त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश प्रक्रियेसाठीही पुरेसा वेळ मिळेल. लवकर निकाल जाहीर झाल्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रियेला वेळेवर सामोरे जाण्यास मदत होणार आहे. यापूर्वी, निकाल उशिरा लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील वर्षीची प्रवेश प्रक्रिया आणि पुरवणी परीक्षांसाठी कमी वेळ मिळत असे. मात्र यंदा तसे होणार नाही. कुठे पाहता येणार निकाल ? mahahsscboard.in mahresult.nic.in hscresult.mkcl.org msbshse.co.in mh-ssc.ac.in sscboardpune.in sscresult.mkcl.org hsc.mahresults.org.in

## महिला शेतकऱ्याला विवस्त्र होईपर्यंत मारहाण, धाराशिव मध्ये पवनचक्की कंपनीच्या खाजगी सिक्युरिटीची दादागिरी

मुलाला कामावरून का काढलं याचा जाब विचारण्यासाठी आणि शेतीतील नुकसानीचा मोबदला मागण्यासाठी गेलेल्या महिला शेतकऱ्याला पवनचक्कीच्या खाजगी सेक्युरिटीने बेदम मारहाण केल्याची अमानुष घटना धाराशिवजवळ घडली आहे. त्या महिला शेतकऱ्यासह तिच्या मुलाला एवढी मारहाण केली की त्यांचे कपडे फाटले. विवस्त्र होईपर्यंत करण्यात आलेल्या या मारहाणीच्या घटनेमुळे तुळजापूर तालुक्यामध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेचा व्हिडीओही व्हायरल झाला असून तो पाहणाऱ्यांचे रक्त अक्षरश: उसळलं आहे.धक्कादायक गोष्ट म्हणजे या प्रकरणानंतर पीडित महिला तक्रार करण्यास पोलिसांत गेली असता पोलिसांनी त्यांची तक्रारही नोंदवून घेतली नाही. उलट त्या पोलिसांनी नळदुर्गच्या शेतकऱ्यावरच गुन्हा दाखल करण्याचीही धमकी दिली. या संपूर्ण घटनेमुळे संतापाच वातावरण असून मारहाण करणाऱ्या सेक्युरिटीच्या व्यक्तीवर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.काय आहे प्रकरण ?धाराशिवच्या तुळजापूर तालुक्यातील गंधोरा येथे हा प्रकार घडला. मुलाला कामावरून का काढले म्हणून विचारण्यासाठी आणि शेतातील नुकसानीचा मोबदला मागण्यासाठी गेलेल्या महिला शेतकऱ्याला पवनचक्कीच्या खाजगी सेक्युरिटीने बेदम मारहाण केली. महिला शेतकऱ्यासह तिच्या मुलाला विवस्त्र होईपर्यंत केलेल्या मारहाणीमुळे तुळजापूर तालुक्यामध्ये संताप व्यक्त होतोय.

## अवैध वाळुची वाहतुक करणारा ट्रॅक्टर जप्त

माजलगाव। प्रतिनिधी तालुक्यातील ईरला मजरा येथील सिंधफना नदी पात्रातुन वाळुचा अवैध उपसा करुन त्याची वाहतुक करणारा ट्रॅक्टर माजलगाव ग्रामिण पोलीस पथक गस्तीवर असताना आढळुन आल्याने तो जप्त करुन संबंधित आरोपी नामे योगेश आसाराम काटवटे याला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे. प्रकरणी पोह उद्धव मदनराव राऊत यांनी ग्रामिण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरुन त्यांच्या सह पोलीस पथक २३एप्रिल बुधवार रोजी च्या पहाटे ४वा च्या सुमारास ईरला मजरा गावा नजीक गस्तीवर असताना त्या गावाच्या शिवारातील सिंधफना नदी पात्रातुन वाळुचा अवैध उपसा करुन त्याची महिंद्रा अर्जुन अलट्रा ५५५, विना नंबर हेड,ट्रॉली मधुन आरोपी योगेश आसाराम काटवटे वाहतुक करत असल्याचे आढळुन आल्याने ट्रॅक्टर जप्त करुन नमुद आरोपी विरोधात भान्यासं कलम ३०३सह मोटार वाहन अधिनियम कायद्याच्या कलम ५०/१७७प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव तहसीलदार माजलगाव यांच्या कडे सादर केला असल्याच सांगितले जाते.

## समता विद्यालय भोसरी पुणे येथील ओळख ज्ञानेश्वरीची व हरिपाठ उपक्रमा अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न.

बुधवार दि 22 एप्रिल 2025 ला ओळख ज्ञानेश्वरीची यां उपक्रमा अंतर्गत शालेय जीवनात अध्यात्मिक संस्कार वर्ग गेली 5 ते 6 वर्ष झाले संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, संत ज्ञानेश्वर विद्यालय, संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती, व पत्रकार संघ आळंदी देवाची यां द्वारा, महाराष्ट्रात बरेच ठिकाणी जवळ जवळ 88 ठिकाणी ओळख ज्ञानेश्वरीची हा उपक्रम शालेय जीवनात विदयार्थ्यांना विनामूल्य तत्वावर देण्यात येत आहे त्या पैकी एक स्वामी विवेकानंद मंडळाचे समता विद्यालय भोसरी येथे हा उपक्रम चालविण्यात येतो त्यांउपक्रमतील



मुलांची शेवटी परीक्षा घेतली जाते त्यातून विशेष प्राविण्य प्राप्त झालेल्या मुलांना बक्षीस वितरणाचाही कार्यक्रम होतो तो काल समता विद्यालय भोसरी येथे घेण्यात आला त्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ओळख ज्ञानेश्वरीची यां परिवारातील संत ज्ञानेश्वर चरित्र समितीचे अध्यक्ष श्री प्रकाशजी काळे होते प्रमुख पाहुणे अकोट चे श्री केशवराव अवारे पाटील असून उदघाटक सन्माननीय श्री श्रीधर घुंडरे सरहोते विशेष उपस्थिती लाभलेले श्री पुरुषोत्तम महाराज हिंगणकर होते आणि संस्थेच्या सन्माननीय प्राचार्य सौ एस एस घुंडरे मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सन्मानीय अतिथीचा थोडक्यात परिचय करून दिला आणि तर मंचा वरील सर्व सन्माननीय पाहुण्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला श्री पुरुषोत्तम महाराज यांनी आपल्या भाषणात विद्यार्थांना जीवनात अध्यात्मिक संत वांगमयातील संस्काराची शिदोरी किती महत्वाची असते हे अधोरेखित केले तर अध्यक्ष श्री प्रकाश काळे यांनी जेवणात तुपाचे महत्व जसे कमी असलेले तूप पण किती महत्वाचे आहे हे उदाहरण देऊन संस्काराचे महत्व आपल्या भाषणातून विषद केले त्या नंतर समन्वयकांक श्री प्रल्हाद महाराज भुईभार, प्रा. श्रीधर घुंडरे सर आदिकरून मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. व समता विद्यालय भोसरी पुणे येथील ओळख ज्ञानेश्वरीची व हरिपाठ अभ्यास क्रमातील लेखी परीक्षेतील जाहीर निकाल सर्वोत्कृष्ट साक्षी आनंदा डुमने (ई ७) प्रथम क्रमांक वैष्णवी सुनील वरणकार (ई ६) द्वितीय क्रमांक तनुजा माधव तुंबरे ( ई ७) तृतीय क्रमांक विनायक देवानंद गाडे (ई ५) उत्तेजनार्थ आदेश आनंदा डुमने (ई ५) आदी करून विशेष प्राविन्य प्राप्त मुलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झाला आणि शेवटी आभार प्रदर्शन श्री मल्लिकार्जुन एकलारे सर यांनी आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# पहलगाम वर बोलताना ठाकरे गटाच्या अनुपस्थिती वर फडणवीसांचा संताप

पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. पाकिस्ताविरोधात महत्त्वाचे पाच निर्णय घेतल्यानंतर सरकारने या बैठकीचे आयोजन केले होते. महाराष्ट्रातील ठाकरे यांच्या शिवसेनेचे प्रतिनिधी मात्र या बैठकीला उपस्थित नव्हते. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे.

“मला या गोष्टीचे फार दु:ख आहे. जेव्हा शत्रू आपल्यावर हल्ला करतो, पहलगामसारखा हल्ला केला जातो, तेव्हा भारतीय पक्षांनी राजकारण केलेलं नाही. दिवंगत नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी बांगलादेश युद्धाच्या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पूर्णपणे पाठिंबा दिला होता. आज मात्र अल्पमतीने भूमिका घेतली जात आहे,” अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. … तरी वाजपेयी यांनी इंदिरा गांधींना समर्थन दिले होते “भारतात युद्धसदृश परिस्थिती असो, देशावर हल्ला असो किंवा देशाच्या संदर्भात एखादी बाब असो, या देशातल्या राजकीय पक्षांनी कधीही पक्षाकडे पाहिलेलं नाही. बांगलादेशच्या युद्धाच्या काळात देशात पक्षा-पक्षांमध्ये टोकाची लढाई चालू होती. पण वाजपेयी यांनी इंदिरा गांधींना समर्थन दिले होते. हीच भारताची परंपरा राहिलेली आहे. पण अशाही परिस्थितीत विरोध करणं, उपहास करणं, मुर्खासारखी विधानं करणं हे जे चाललंय, त्याला देशाची जनता माफ करणार नाही,” असा हल्लाबोल फडणवीस यांनी ठाकरे गटावर केला.

ठाकरे गटाच्या पक्षाचे प्रतिनिधी होते अनुपस्थित

दिल्लीमध्ये पार पडलेल्या सर्वपक्षीय बैठकीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. या बैठकीचे निमंत्रण ठाकरे गटाला देण्यात आले होते. मात्र संसदेतील ठाकरे गटाचे फ्लोअर लिडर अरविंद सावंत यांनी सरकारला एक पत्र लिहून काही अपरिहार्य कारणामुळे या बैठकीला उपस्थित राहू शकत नाही, असे कळवले होते. तसेच अशा कठीण परिस्थितीत आमचा पक्ष सरकारसोबत पूर्ण ताकदीने उभा आहे, असेही ठाकरे गटाने केंद्र सरकारला आश्वस्त केले होते. महाराष्ट्र सरकारकडून हेल्पलाईन जारी दरम्यान, राज्य सरकारकडून काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रायीन नागरिकांना परत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. विशेष विमानाने या नागरिकांना महाराष्ट्रात आणले जात आहे. त्यासाठी काही हेल्पलाईन्सही सरकारने जारी कोलेल्या आहेत.





This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com